जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात होत असलेल्या शिवोत्सव २०१७ च्या पूर्वसंध्येला विद्यापीठाची इमारत रोषणाईने उजळून गेली.

# 'शिवोत्सव' रंगणार आजपासून

## देशभरातून विद्यार्थ्यांचे आगमन : पूर्वसंध्येला रंगल्या रंगीत तालमी

कोल्हापूर, ता. ९ : तरुणाईच्या कलागुणांना वाव देणाऱ्या 'शिवोत्सव-२०१७'साठी शिवाजी विद्यापीठातर्फे जय्यत तयार करण्यात आली आहे. देशभरातील विविध विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांचे येथे आगमन झाले असून महोत्सवाच्या पूर्वसंध्येला विद्यार्थ्यांच्या रंगीत तालमीही रंगल्या. उद्या (ता. १०) शाहू छत्रपती महाराज, अभिनेता सचिन खेडेकर व भारतीय विद्यापीठ महासंघाचे (एआययू) सहसचिव डॉ. डेव्हिड सॅम्पसन यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी सहा वाजता महोत्सवाचे उद्‌घाटन होणार आहे. तत्पूर्वी दुपारी साडेतीन वाजता

### आज असे होतील कार्यक्रम

- ९.३० ते १२.३० ..... नाव नोंदणी (लोककला केंद्र)
- ११.०० ते १२.०० .... संघ व्यवस्थापक बैठक (शाहू हॉल)
- ३.०० ते ५.३० ...... शोभायात्रेस प्रारंभ
- ६.०० ते ७.३० ...... महोत्सवाचे उद्‌घाटन
- ७.३० ते ८.३० ...... सांस्कृतिक कार्यक्रम

'रोकडविरहित आर्थिक व्यवहार : भारतीय अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण' असा संदेश देत शोभायात्रेस प्रारंभ होणार आहे.

केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालय, भारतीय विद्यापीठ आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव शिवोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे. त्यासाठी काल (ता. ८) रात्रीपासूनच विविध विद्यापीठांचे विद्यार्थी विद्यापीठात येण्यास सुरवात झाली. आज दुपारपर्यंत आल्यानंतर विद्यार्थ्यांनी तत्काळ विविध सभागृहांची पाहणी करत रंगीत तालमीही केल्या. लोककला केंद्र कार्यक्रमासाठी सुसज्ज करण्यात आले असून तेथे साऊंड, आकर्षक लाईट व्यवस्था केली आहे. पाच हजार खुर्च्यांची मांडणीही करण्यात आली आहे. ॲनेक्स बिल्डिंगसमोर भोजनालयासाठी शामियाना उभारला आहे.

बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, वित्त व लेखाधिकारी डॉ. अजित चौगुले यांनी

## 'शिवोत्सव' रंगणार आजप[illegible]न

» पान १ वरून

लोककला केंद्र, भाषाभवन, नीलांबरी हॉल, मानव्यशास्त्र सभागृह, संगीत व नाट्यशास्त्र विभागाची सायंकाळी पाहणी केली. उद्या (ता. १०) दुपारी साडेतीन वाजता मुख्य इमारतीपासून शोभायात्रेस सुरवात होणार आहे. दूरशिक्षण विभाग, सायबर चौक, सागरमाळ, मालती अपार्टमेंट, एनसीसी ऑफिस ते पुन्हा लोककला केंद्र असा शोभायात्रेचा मार्ग राहील. सायंकाळी सहा वाजता महोत्सवाचे उद्‌घाटन झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठातर्फे महाराष्ट्रीय संस्कृतीचे दर्शन घडविणारा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

### असे होतील कार्यक्रम :

- ११ फेब्रुवारी : ९.३० : प्रश्नमंजूषा (नीलांबरी हॉल) - क्लासिकल इन्स्ट्रुमेंट सोलो (संगीत व नाट्यशास्त्र विभाग) - पोस्टर मेकिंग (मानव्यशास्त्र सभागृह) १०.०० : वेस्टर्न सोलो (लोककला केंद्र) - एकांकिका (भाषा भवन) १.०० : वेस्टर्न ग्रुप गीत (लोककला केंद्र) - वक्तृत्व (नीलांबरी हॉल) - कोलाज (मानव्यशास्त्र सभागृह) २.०० : क्लासिक इन्स्ट्रुमेंटस सोलो (संगीत व नाट्यशास्त्र विभाग) ४.०० : फोक ऑर्केस्ट्रॉ (लोककला केंद्र)
- १२ फेब्रुवारी : ९.३० : वादविवाद (नीलांबरी हॉल) - इन्स्टॉलेशन (मानव्यशास्त्र सभागृह) - क्ले मॉडेलिंग (संगीत व नाट्यशास्त्र विभाग) १०.०० : लाइट व्होकल-इंडियन (लोककला केंद्र) - एकांकिका (भाषा भवन) १.०० : प्रश्नमंजूषा अंतिम (नीलांबरी हॉल) - काटुर्निंग (मानव्यशास्त्र सभागृह) - समूहगीत-भारतीय (लोककला केंद्र) ६.०० : मूकनाट्य
- १३ फेब्रुवारी : ९.३० : स्किट (भाषा भवन) - स्पॉट फोटोग्राफी व स्पॉट पेंटिंग (मानव्यशास्त्र सभागृह) - रांगोळी (संगीत व नाट्यशास्त्र विभाग) १०.०० : क्लासिकल डान्स (लोककला केंद्र) ३.०० : फोक/ट्रायबल डान्स (लोककला केंद्र) ५.०० : मिमिक्री (भाषा भवन)
- १४ फेब्रुवारी : १०.३० : महोत्सवाचा समारोप

10 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आदित्य वेल्हाळ



## रोषणाईने विद्यापीठ झळाळले!

शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून 'शिवोत्सव' राष्ट्रीय महोत्सव रंगणार आहे. देशभरातील विद्यापीठांचा या महोत्सवात सहभाग असणार आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई लक्ष वेधून घेत आहे.

10 FEB 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ सजले : देशभरातील विद्यार्थी कलाकारांच्या स्वागतासाठी सुरु आहे लगबग

# 'शिवोत्सवा'त तरुणाई आजपासून रंगणार

आदित्य वेल्हाळ

कोल्हापूर : 'शिवोत्सव' या ३२ व्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सवात आज, शुक्रवारपासून पाच दिवस देशभरातील तरुणाईचा कलाविष्कार बहरणार आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठ सजले आहे. महोत्सवाच्या पूर्वसंध्येला गुरुवारी विद्यापीठात तयारीची लगबग सुरु होती.

केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालय, भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने होणारा 'शिवोत्सव' हा लोकनृत्य, पाश्चिमात्य नृत्य, संगीत, वादविवाद, एकांकिका, लोककला, आदी प्रकारांमध्ये रंगणार आहे. त्यात देशभरातील ८० हून अधिक विद्यापीठांमधील सुमारे १३०० विद्यार्थी कलाकार भारतीय कला-संस्कृतीचे दर्शन घडविणार आहेत.

महोत्सवाचा प्रारंभ आज, शुक्रवारी दुपारी तीन वाजता सहभागी संघांच्या शोभायात्रेने होणार आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत, मुलींचे वसतिगृह, सायबर चौक, माऊली चौक, चांदीचा गणपती मंदिर (शाहूनगर), प्रतिभानगर, मालती अपार्टमेंट, एनसीसी भवन ते लोककला केंद्र असा शोभायात्रेचा मार्ग आहे. त्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजता लोककला केंद्रात महोत्सवाचे उद्घाटन शाहू छत्रपती, चित्रपट अभिनेते सचिन खेडेकर, 'एआययू'चे सहसचिव डॉ. डेव्हिड सॅम्पसन, प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर होणार आहे.

दरम्यान, विद्यापीठाकडून गुरुवारी स्वागतकमान उभारणी, मुख्य इमारतीची रंगरंगोटी-स्वच्छता, महोत्सवाचे उद्घाटन, विविध सभागृह, खुला मंच सज्जतेची तयारी वेगाने सुरु होती. रात्री उशिरापर्यंत तयारीची लगबग सुरु होती. महोत्सवातील सहभागी संघांच्या स्वागतासह त्यांना विद्यापीठात आणण्यासाठी रेल्वे स्थानकापासून एनएसएसचे स्वयंसेवक, विद्यापीठातील कर्मचारी कार्यान्वित होते. आकर्षक विद्युत रोषणाईने विद्यापीठाची मुख्य इमारत झळाळून निघाली होती. प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव आदींनी पाहणी केली. (प्रतिनिधी)





शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून 'शिवोत्सव' राष्ट्रीय महोत्सव रंगणार आहे. त्याच्या तयारीसाठी गुरुवारी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या रंगरंगोटीचे काम सुरु होते, तर दुसऱ्या छायाचित्रात महोत्सवासाठी मुख्य व्यासपीठ असलेल्या लोककला केंद्रातील तयारी गुरुवारी वेगाने सुरु होती.

### परिसरात फेरफटका, तालीम रंगली

या महोत्सवासाठी गुरुवारी सायंकाळी ६ पर्यंत ६९ विद्यापीठांच्या संघांनी नोंदणी केली. सकाळी दहा वाजल्यापासून विद्यापीठात संघांचे आगमन होऊ लागले. दिवसभरात मणिपूर, चेन्नई, अमृतसर, म्हैसूर, पद्मावती युनिव्हर्सिटी, कुरुक्षेत्र विद्यापीठ, तेजपूर, कालिकत युनिव्हर्सिटी, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती, नागपूर विद्यापीठ आदी संघ दाखल झाले. विद्यापीठात दाखल झालेल्या संघांतील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी निवासाच्या ठिकाणी साहित्य ठेवल्यानंतर परिसरात फेरफटका मारला. काहींची निवास व्यवस्थेच्या ठिकाणी तालीम रंगली होती.

10 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'शिवोत्सवा'त रंगणार तरुणाईचा आविष्कार!



**स्वत:मधील कलागुण योग्य ठिकाणी मांडल्यास त्यामधून स्वतःची इमेज तयार करण्यास मदत होते. महाविद्यालयीन युवा वर्ग त्यासाठी धडपडत असतो. महाविद्यालयातील गुलाबी दिवसांत तर स्वत:ला व्यक्त करण्याची जागा प्रत्येक जण शोधत असतो. स्नेहसंमेलनांतून त्याचे प्रतिबिंब पाहायला मिळते. शिवाजी विद्यापीठात आजपासून (ता. १०) सुरू होणाऱ्या 'शिवोत्सव-२०१७'मध्ये देशभरातील विद्यार्थ्यांचे कलागुण अनुभवायला मिळणार आहे.**

- संदीप खांडेकर

यंदा विद्यापीठाला ३२ व्या आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या आयोजनाचा मान मिळाला आहे. ६५ हून अधिक विद्यापीठांचा यामध्ये सहभाग असेल. देशाच्या विविधतेमधील एकतेचे रूप येथे पाहायला मिळणार आहे. पंजाबमधील अमृतसरचे गुरुनानक देव, जालंदरचे लव्हली प्रोफेशनल, मुंबईचे मुंबई, राजस्थानचे वनस्थळी, पश्चिम बंगालमधील मिदिनीपूर, कोचीन, अमरावतीचे संत गाडगेबाबा, नागपूरचे डॉ. संत तुकडोजी महाराज या विद्यापीठांमध्ये राष्ट्रीय स्तरावर चढाओढ असते. २७ कला प्रकारांत आपले कौशल्य सादर करताना त्यांचा कस लागतो. महोत्सवामध्ये शिवाजी विद्यापीठाचा ११ जणांचा संघ असून तो मूकनाट्य व स्पॉट फोटोग्राफीमध्ये आपले कौशल्य दाखविण्यास उत्सुक आहे. गतवर्षी म्हैसूरमध्ये झालेल्या महोत्सवात विद्यापीठाचा फोक ऑर्केस्ट्रा, एकांकिका, सुगम गायन, पाश्चात्त्य समूहगान या प्रकारांत समावेश होता. यंदा दोन प्रकार असले, तरी डॉ. नवनाथ गुंड व डॉ. मीना पोतदार यांच्या नेतृत्वाखालील विद्यापीठाच्या कलाकारांकडून नक्कीच उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा आहे. इंदूर येथील अहल्यादेवी विद्यापीठात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय महोत्सवाकरिता विद्यापीठाचा २० जणांचा संघ जाणार आहे. त्यांना महोत्सवाच्या निमित्ताने आताच शुभेच्छा देऊया.

विद्यापीठ प्रशासनाने महोत्सवासाठी जय्यत तयारी केली आहे. विद्यापीठाचा परिसर महोत्सवाच्या पूर्वसंध्येला उजळून निघालेला आहे. पंजाब, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, मणीपूरमधील विद्यार्थी आजच विद्यापीठात दाखल झाले आहेत. त्यांच्या येण्याने विद्यापीठाचे वातावरण उत्साही बनले आहे. अधिकारी व कर्मचारी वर्ग बैठकांच्या धावपळीत गुंतला आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे हे परदेश दौऱ्यावर असल्यामुळे महोत्सवास उपस्थित राहू शकत नसले, तरी प्रशासनाने महोत्सवात कोणतीही कमतरता पडू नये, याबाबत कंबर कसली आहे. विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव हे महोत्सवाच्या संयोजनाची जबाबदारी पेलत आहेत. त्यांच्याप्रमाणेच महोत्सवासाठी आलेल्या विद्यार्थ्यांचा चांगला पाहुणचार करण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. कोल्हापूरकर म्हणून देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक तर आपण केलेच पाहिजे; शिवाय हा महोत्सव अविस्मरणीय करण्यासाठी, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद देण्यासाठी उपस्थितीही लावली पाहिजे.

> **या महोत्सवाच्या निमित्ताने देशभरातील वैविध्यपूर्ण संस्कृती कोल्हापुरातील रसिकांना पाहावयास मिळणार आहे. या बहुसंस्कृतीमधून देशाच्या एकतेचे चित्र आपल्याला पाहावयास मिळणार आहे. युवकांमधील विविध गुणांना मोठे व्यासपीठ उपलब्ध होत आहे.**
> **-डॉ. आर. व्ही. गुरव**

10 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



**शिवाजी विद्यापीठात आजपासून युवा महोत्सव...** कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून होणाऱ्या ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाची तयारी पूर्ण झाली असून, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीवर आकर्षक विद्युत रोषणाईही करण्यात आली आहे. विविधरंगी रोषणाईमुळे इमारतीच्या सौंदर्याने डोळ्याचे पारणे फेडणारे दिसते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017

महाराष्ट्र टाईम्स



झळाळी

शिवाजी विद्यापीठात आजपासून युवा महोत्सव सुरु होत आहे. महोत्सवाच्या पूर्वसंध्येला गुरुवारी विद्यापीठाची मुख्य इमारत आकर्षक रोषणाईने अशी उजळून निघाली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
सकाळ

# राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी शिवाजी विद्यापीठाचे 'ॲप'

## आजपासून प्रारंभ : 'शिवोत्सव २०१७' खास वेब पेज

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठात उद्या, शुक्रवारपासून साजरा होणाऱ्या ३२ व्या अखिल भारतीय युवा महोत्सवासाठी प्रथमच मोबाईल ॲप विकसित केले आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'शिवोत्सव २०१७' हे खास पेज कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केले.

कोल्हापूरच्या इझी अँड युजफुल कंपनीने 'शिवोत्सव २०१७' या नावाने खास अँड्रॉईड मोबाइल ॲप तयार केले आहे. कार्यक्रमांचे वेळापत्रक, कार्यक्रमस्थळांचे गुगल नकाशे, स्पर्धकांची निवासाची सोय दर्शवणारे गुगल नकाशे, रेल्वे व एस. टी. बस वेळापत्रक, शिवाजी विद्यापीठ व कोल्हापूर परिसराचे गुगल नकाशे, शिवोत्सवाच्या सर्व समिती सदस्यांची नावे व महत्त्वाचे दूरध्वनी, मोबाइल क्रमांक अशी आवश्यक माहिती त्यात आहे. त्यामुळे देशभरातून कोल्हापुरात येणाऱ्या स्पर्धकांना स्पर्धास्थळी पोहोचेपर्यंत व संपूर्ण कार्यक्रम





पार पडेपर्यंत कोणतीही अडचण येणार नाही. ॲपमध्ये कोल्हापूर परिसराची ओळख, शहरातील व जिल्ह्यातील पर्यटनस्थळांची नावे, फोटो व गुगल नकाशे, तसेच कोल्हापुरी मटण, मिसळपाव, गूळ, साज वगैरे अनोख्या वैशिष्ट्यांची माहितीही उपलब्ध आहे. हे ॲप वापरणाऱ्यांपर्यंत त्वरित मेसेज पाठवण्याची सोयही उपलब्ध आहे. गुगल प्ले स्टोअरवर 'शिवोत्सव २०१७' हे ॲप उपलब्ध आहे. राष्ट्रीय युवा महोत्सवाचे ॲप प्रथमच तयार करण्याचा मान मिळाला आहे.

10 FEB 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ परिसरात युवा महोत्सवाचा माहोल

## शोभायात्रेने आज होणार नांदी : अभिनेते सचिन खेडकर राहणार उपस्थित, सोहळ्याची तयारी पूर्ण

प्रतिनिधी
कोल्हापूर

भव्य अशा शोभायात्रेने शिवाजी विद्यापीठात आज ३२ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाला प्रारंभ होणार आहे. त्यासाठीची जय्यत तयारी विद्यापीठ प्रशासनाने केली असून, आगामी चार दिवस अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल सुरू राहणार आहे.

मंगळवार १४ पर्यंत हा महोत्सव सुरू राहील. शुक्रवारी सायंकाळी ५ वाजता श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते युवा महोत्सव शोभायात्रेचे उद्घाटन होईल. अभिनेते सचिन खेडकर, भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन या कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. महोत्सवासाठी देशभरातील सुमारे ८० विद्यापीठातील संघ दाखल झाले असून, विद्यापीठाचा परिसर या विद्यार्थ्यांनी गजबजून गेला आहे.

राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी 'कॅशलेस



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आजपासून ३२ वा राष्ट्रीय युवा महोत्सव साजरा होत आहे. या महोत्सवाच्या दिमाखात भर पडेल अशी सजावट विद्यापीठाच्या मुख्य इमारतीची करण्यात आली आहे. आकर्षक विद्युत रोषणाईने तर इमारतीचे सौंदर्य आणखी खुलून आले आहे.**

आर्थिक व्यवहार : भारतीय अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण' या विषयावर शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यामध्ये देशभरातील ८० विद्यापीठातील कलाकार आपापल्या राज्यातील वेशभूषा करून सहभागी होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
पुढारी

# आजपासून राष्ट्रीय युवा महोत्सव

कोल्हापूर : प्रतिनिधी

३२ वा ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी नॅशनल युथ फेस्टिव्हल 'शिवोत्सव २०१७' १० फेब्रुवारीपासून शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात रंगणार आहे. दुपारी तीन वाजता विद्यापीठातून शोभायात्रा काढली जाणार आहे. सायंकाळी साडेपाच वाजता शाहू महाराज यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे. यावेळी एआययू नवी



दिल्लीचे सहसचिव डॉ. सॅम्पसन डेव्हिड व सिनेअभिनेते सचिन खेडेकर विशेष उपस्थित राहणार आहेत. पाच दिवस चालणाऱ्या या फेस्टिव्हलसाठी देशभरातील ८२ विद्यापीठांतील दहा हजार विद्यार्थी सहभागी आहेत. दरम्यान, युथ महोत्सवासाठी गुरुवारी रात्री उशिरापर्यंत विद्यार्थ्यांचे संघ विद्यापीठात दाखल होत होते. प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे

'शिवोउत्सव २०१७' मध्ये ईस्ट, वेस्ट, साऊथ, नॉर्थ, सेंट्रल असे देशभरातील सर्व विद्यापीठांच्या झोनमधील विद्यार्थी स्पर्धकांचा सहभाग असणार आहे. शिवाजी विद्यापीठातील ९० तर एकूण दीड हजार स्पर्धक सहभागी होणार आहेत. देशभरातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची सुविधा विद्यापीठ परिसरात करण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने एनसीसी, एनएसएस तसेच विविध पथके तयार करण्यात आली आहेत. पोलिसांचेही यासाठी सहकार्य घेण्यात आले आहे. उद्‌घाटनाच्या दिवशी सकाळी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्रातील कलासंस्कृतीचे दर्शन घडवणारे मराठमोळ्या कार्यक्रमांचे विशेष सादरीकरण केले जाणार आहे. काश्मीर, पंजाब, मध्यप्रदेश, हरियाणा, नवी दिल्ली, मुंबई आदींसह बहुतांश विद्यापीठांची नोंदणी करण्यात आली आहे. समारोपाचा कार्यक्रम १४ फेब्रुवारीला साडेदहा वाजता होईल. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे डॉ. अमित सैनी, प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे तर सिनेअभिनेते सयाजी शिंदे, हिंदू बनारस विश्वविद्यालयाचे प्रा. एस. के. शर्मा आदी उपस्थित असतील.

- देशभरातून विद्यार्थी संघाचे आगमन
- विद्यापीठ प्रशासनाकडून जय्यत तयारी
- दीड हजार कलाकारांचे सादरीकरण
- दुपारी शोभायात्रा : सायंकाळी उद्‌घाटन
- मान्यवरांसोबत सिनेकलाकार सचिन खेडेकर

### विद्यार्थ्यांची राहण्याची कॅम्पसमध्ये सुविधा

मोठ्या संख्येने महोत्सवासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सुविधा विद्यापीठाच्या कॅम्पसमध्येच करण्यात आली आहे. तसेच नाष्टा, जेवण यासाठीही कॅम्पसमध्ये विविध विभागात नियोजन करण्यात आले आहे.

### सुरक्षेला प्राधान्य

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचे नियोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा सुरक्षा विभाग, एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी पथक तसेच पोलिसांचेही सहकार्य घेण्यात आले असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

## मोबाईल ॲपचे लॉंचिंग

युवक महोत्सवासाठी शिवोत्सव-२०१७ या वेबपेजवर तसेच गुगल प्ले स्टोअरवर शिवोत्सव २०१७ या नावाने हे मोबाईल ॲप उपलब्ध असणार आहे. या ॲपचे लॉंचिंग आज करण्यात आले. या ॲपमध्ये कार्यक्रमाचे वेळापत्रक, राहण्याची सोय, कार्यक्रमाची ठिकाणे, एस.टी. बस वेळापत्रक, कोल्हापूर परिसराचे नकाशे आदींची माहिती आहे. महोत्सवाची सविस्तर माहिती देण्यासाठी विद्यापीठाने वेबपेज निर्माण केले आहे.

10 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या शिवोत्सवासाठी उभारण्यात आलेला मंडप. दुसऱ्या छायाचित्रात महोत्सवासाठी आलेले पंजाब टेक्निकल युनिव्हर्सिटीचे विद्यार्थी. (छाया : अमर कांबळे)

# परराज्यातील विद्यार्थ्यांनी विद्यापीठ बहरले

## शिवोत्सवाची तयारी पूर्ण; आरोग्य-सुरक्षा यंत्रणा सज्ज

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात शुक्रवार, दि. १० पासून सुरू होणाऱ्या शिवोत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. शिवोत्सवासाठी परराज्यांतील विद्यापीठांचे विद्यार्थी दाखल झाले आहेत. त्यामुळे विद्यापीठ परिसर बहरल्याचे पाहायला मिळत आहे. स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या ठिकाणी मंडप व स्टेज बांधणीचे काम पूर्ण झाले आहे, तर महोत्सवाच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सुरक्षा यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच आरोग्य पथक दिवसभर कार्यक्रमाच्या ठिकाणी तैनात ठेवण्यात येणार आहे.

केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक संचालनालयाच्या वतीने होणाऱ्या आंतरविद्यापीठ युवामहोत्सवाची सुरुवात (शिवोत्सव-२०१७) शुक्रवार, दि. १० पासून होणार आहे. महोत्सव यशस्वी व्हावा यासाठी २६ विविध कमिट्या करण्यात आल्या आहेत. या कमिट्यांमार्फत कार्यक्रमाची नियोजनबद्ध आखणी करण्यात आली आहे.

गुरुवारी सकाळपासूनच परराज्यातील विद्यापीठांचे विद्यार्थी विद्यापीठात येण्यास सुरुवात झाली आहे. या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय येथील वसतिगृहात करण्यात आली आहे. मुख्य कार्यक्रम असलेल्या लोककला केंद्रामध्ये महोत्सवाच्या उद्घाटन समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे. नोंदणी कक्ष उभारण्यासह अन्य कामे पूर्ण करण्यात आली आहेत.



चार दिवस चालणाऱ्या महोत्सवात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विद्यापीठाकडून सुरक्षा यंत्रणा तैनात करण्यात येणार आहे. महोत्सव काळात राजारामपुरी पोलीस ठाण्याकडून मदत मागवण्यात आली आहे, तर राजाराम महाविद्यालयाचे एन.सी.सी. कॅडेटस् विद्यार्थी कार्यक्रमाच्या प्रत्येक मंडपाच्या शेजारी थांबणार आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाच्या ठिकाणी अग्निशामक यंत्रणा सज्ज ठेवण्यात येणार आहेत, तर विद्यापीठाच्या आरोग्य विभागाचे आरोग्य पथक दिवसभर कार्यक्रमाच्या ठिकाणी तैनात ठेवण्यात येणार आहे.

### महोत्सवातून विद्यापीठाचे ब्रँडिंग

युवामहोत्सवाच्या निमित्ताने देशभरातील विद्यापीठांचे विद्यार्थी व अतिथी शिवाजी विद्यापीठात येणार आहेत. त्यांना विद्यापीठाचे वेगळेपण कळावे यासाठी विद्यापीठामार्फत विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. त्यामध्ये विद्यापीठाची संपूर्ण माहिती असलेले पत्रक, मोबाईल-वेबपेज या माध्यमातून विद्यापीठातील वैशिष्ट्ये झळकवण्यात येणार आहेत. मोबाईल अॅप वेबपेजद्वारे कार्यक्रम व अन्य माहिती उपलब्ध होणार आहे.

10 FEB 2017

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवा[illegible] विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आजपासून राष्ट्रीय युवा महोत्सव

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**शिवाजी विद्यापीठात** उद्यापासून (शुक्रवार) ३२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सवास (शिवोत्सव-२०१७) प्रारंभ होत आहे. महोत्सवाचे उद्घाटन श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते होणार असून यावेळी प्रख्यात अभिनेते सचिन खेडेकर आणि भारतीय विद्यापीठ महासंघाचे सहसचिव डॉ. डेव्हीड सॅम्पसन यांची प्रमुख उपस्थिती आहे.

महोत्सवाच्या समारोप समारंभास कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी प्रमुख पाहुणे असतील, तर प्रख्यात अभिनेते सयाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. ए. आय. यू. कडून निरीक्षक म्हणून हिंदू बनारस विश्वविद्यालयाचे प्रा. एस.के. शर्मा उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन व समारोप समारंभ विद्यापीठाच्या लोककला केंद्र सभागृहात होतील. उद्घाटन समारंभ १० फेब्रुवारीला सायंकाळी साडेपाच वाजता, तर समारोप समारंभ १४ फेब्रुवारीला सकाळी साडेदहा वाजता होईल. या महोत्सवांतर्गत होणाऱ्या विविध २७ कलाप्रकारांत देशभरातील ६६ विद्यापीठांच्या संघांनी आतापर्यंत नोंदणी केली असून सुमारे १०२० विद्यार्थी-विद्यार्थिनींसह १२२ संघ व्यवस्थापकांचा यात समावेश आहे.

विद्यार्थी कल्याण संचालक डॉ.आर.व्ही. गुरव म्हणाले, केंद्र सरकारच्या क्रीडा व युवा मंत्रालयातर्फे दरवर्षी राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सव घेण्यात येतो. गेल्या वर्षी म्हैसूरमध्ये महोत्सव झाला होता. देशातील पूर्व, पश्चिम, दक्षिण, उत्तर आणि मध्यवर्ती विभागातील महोत्सवातील विविध कलाप्रकारांमधील पहिल्या तीन क्रमांकांच्या विजेत्या विद्यापीठांचे संघ 'शिवोत्सव'मध्ये सहभागी होतील.

या युवा महोत्सवाची सविस्तर माहिती देण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने एक स्वतंत्र वेबपेज निर्माण केले असून विद्यापीठाच्या वेबसाइटवर 'शिवोत्सव-२०१७' ते होस्ट करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महोत्सवाचे 'शिवोत्सव-२०१७' नावाने अँड्रॉइड अॅप निर्माण करण्यात आले आहे. ते गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध आहे. राष्ट्रीय युवा महोत्सवाचे अॅप प्रथमच तयार करण्याचा बहुमान शिवाजी विद्यापीठास प्राप्त झाला आहे. संगणकशास्त्र अधिविभागाचे प्रा. कबीर खराडे यांनी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेबपेज निर्माण केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

## युवा महोत्सव आजपासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात उद्या (शुक्रवार) पासून ३२व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ युवा महोत्सवाला प्रारंभ होत आहे. गुरुवारी महोत्सवाच्या पूर्वसंध्येला प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी सहभागी स्पर्धक संघांसाठीची नोंदणी, भोजन, निवास तसेच रंगमंच व्यवस्था, आदींची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच, संबंधितांना विविध सूचना केल्या. यावेळी त्यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. एन. भोसले होते. दरम्यान, युवा महोत्सवासाठी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीस आकर्षक विद्युत रोषणाईही करण्यात आली असून, गुरुवारी सायंकाळपासूनच इमारत विविध रंगांत न्हाऊन निघाली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स

# शिवाजी विद्यापीठाकडून 'शिवोत्सव ॲप'ची निर्मिती

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात ११ वर्षांनंतर राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन केले आहे. महोत्सवाच्या माध्यमातून विद्यापीठाची ख्याती सर्वदूर पोहोचविण्यासाठी व स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेची आणि संपूर्ण विद्यापीठाची माहिती देण्यासाठी 'शिवोत्सव ॲप'ची निर्मिती केली आहे. ॲपच्या माध्यमातून विद्यापीठाने केलेल्या कामगिरीची दखल घेतली आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर 'शिवोत्सव-२०१७' ॲप लाँचे केले आहे, अशी माहिती, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी दिली.

डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'आजच्या विद्यार्थ्यांचा टेक्नोसॅव्हीत हातखंडा आहे. जास्तीत-जास्त विद्यार्थी सोशल मीडियाचा वापर करतात. विद्यार्थ्यांची आवड लक्षात घेऊन विद्यापीठाचे नवीन तंत्रज्ञान व शिवोत्सवाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी ॲप व स्वतंत्र वेबपेज तयार केले आहे. ॲपवर ग्रंथालय, बोटॅनिकल गार्डन, भाषा भवन, आदी वैशिष्ट्यांचा अंतर्भाव केला आहे. ॲपच्या आधारे विद्यार्थ्यांना स्पर्धेतील नोंदणीही करता येईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
पुण्यनगरी

# युवा महोत्सवात एड्स जनजागृती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

ऑल इंडियन युनिव्हर्सिटीजच्या वतीने शिवाजी विद्यापीठ येथे १० ते १४ फेब्रुवारी या कालावधीत राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी एड्स जनजागृती करण्यात येणार आहे.

या महोत्सवात देशभरातील ८२ विद्यापीठांतील सुमारे १५०० युवक-युवतींचा सहभाग असणार आहेत. एड्स प्रतिबंध नियंत्रक संस्थेचे प्रकल्प संचालक कमलाकर फंड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा नियंत्रक पथक, सीपीआर हॉस्पिटल यांच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे नियोजन केले आहे. यामध्ये चित्ररथ, रक्तदान शिबिर, पथनाट्ये, पोस्टर प्रदर्शन याद्वारे एड्सबाबतचे समुपदेशन, माहिती पत्रिका, सेल्फी पॉईंट आदीचे नियोजन करण्यात येत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
Times of India

# SUK fourth in research fest

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) ranked fourth in the final round of the state level Avishkar research festival organized by the state government.

Two students and two teachers ranked second each in their respective categories, out of the 48 participants from the university.

University officials said as many as 536 students from 20 universities had participated in the state level competition held at Swamy Ramanand Tirtha Marathwada University, Nanded earlier this month.

## BAGS FOUR AWARDS

According to university officials, 48 students and teachers from the SUK had participated in the festival..

According to an SUK circular, Avdhut Jadhav won the second prize in the arts, social sciences, and performing arts category, while Priyanka Purohit bagged the second prize in the commerce and management category. Of the faculties, Namdeo Harale stood second in the pure science category, while Rahul Adnaik won the second prize in the agriculture and animal husbandry category.

Acting vice-chancellor of SUK, DR More congratulated the winners and expressed confidence that the number of the research festival winners will rise in future.

AM Gurav, festival coordinator of SUK said that the university had arranged a two-day workshop at its campus on January 19 and 20, to guide participants about the project presentation in the finals, which helped them a lot.

The festival was organized in six educational categories, that included humanities, commerce, pure science, agriculture and animal husbandry, engineering and technology, and medicine and pharmacy. It was open for undergraduate (UG) students, post-graduate (PG) students, research scholars and faculty members.

Earlier, district level, central level and university level Avishkar research festivals were organized in Sangli, Satara and Kolhapur districts in December.

According to the organizers the number of participants had increased substantially in the respective levels this year.

10 FEB 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जीवशास्त्रज्ञांनी एकत्र येण्याची गरज

## डॉ. डी. के. गायकवाड : वारणा महाविद्यालयात राष्ट्रीय अधिवेशन

वारणानगर, ता. ९ : जागतिक स्तरावर मानव कल्याणासाठी सर्व जीवशास्त्रज्ञांनी एकत्रित येऊन काम करण्याची गरज असून, नैसर्गिक वन औषधांचाच उपयोग दीर्घकाळ जीवनमान उंचावण्यासाठी अत्यावश्यक झाला आहे. जीवशास्त्रात संशोधनाच्या विविध संधी उपलब्ध आहेत. पारंपरिक जीवशास्त्राच्या आधारावर अनेक असाध्य रोगांवर इलाज करता येणाऱ्या संशोधनाची गरज अशा परिषदांमधून पूर्ण होईल, असे मत शिवाजी विद्यापीठाचे वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. डी. के. गायकवाड यांनी येथे व्यक्त केले.




**वारणानगर : येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयात झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनात शोध प्रबंधाच्या सीडीचे अनावरण करताना डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. शांताकुमार, जी. डी. पाटील, डॉ. सुरेखा शहापुरे आदी.**

येथील यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र विभागाच्यावतीने 'जैव विज्ञानातील उदयोन्मुख प्रवाह आणि पारंपारिक शास्त्र' या विषयावरचे एक दिवसीय राष्ट्रीय अधिवेशनात ते बोलत होते. शिवाजी विद्यापिठाचे प्राणीशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. शांताकुमार, वारणा विभाग शिक्षण मंडळाचे सचिव जी. डी. पाटील व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. शांताकुमार म्हणाले, "हवामान बदलावर आधारित रोग किडीचा प्रादुर्भावाचा अंदाज वर्तवून हवामान बदलानुसार उपयांचे संशोधन झाले आहे. त्याचे ज्ञान सर्व सामान्यांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे." परिषदेत आधुनिक जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, पर्यावरणशास्त्र, रोगकिडी शास्त्र, औषध विज्ञान, आणि उपयोजित जीवशास्त्र, आधुनिक शेती,जैव, विविधता, आयुर्वेद शास्त्र जागतिक तापमान, रासायनिक प्रदूषण या विषयावरचे शोध निबंध तीन सत्रात आणि तीन वेगवेगळ्या सादर झाले. देशभरातून १४० हून अधिक संशोधकांचे शोधनिबंध प्राप्त झाले. या शोध निबंधाच्या 'सीडी' चे अनावरण झाले. उपस्थिताना संदर्भ ग्रंथ भेट देण्यात आले. डॉ. एस. वाय. जाधव यांनी स्वागत केले. या वेळी प्राचार्या डॉ. सुरेखा शहापुरे यांच्यासह संशोधक, विद्यार्थी उपस्थित होते

10 FEB 2017
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वच्छता संस्कृतीची देशाला गरज : डॉ. बी. के. नागला

कोल्हापूर, ता. ९ : भारतासमोर स्वच्छतेचे आव्हान असल्याने त्याविषयी स्वच्छतेची नवी संस्कृती निर्माण होऊन तिचा उत्कर्ष व्हावा, असे मत हरियाना येथील महर्षी दयानंद विद्यापीठातील प्रा. डॉ. बी. के. नागला यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागातर्फे यूजीसी सॅप-डीआरएस फेज - अंतर्गत आयोजित 'स्वच्छतेचे सांस्कृतिक संदर्भ : समाजशास्त्रीय विश्लेषण' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. जगन कराडे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. नागला म्हणाले, "अजूनही ७० टक्के ग्रामीण भागातील जनता शौचालयाचा वापर करीत नाही. त्याचे अनेक दुष्परिणाम दीर्घकाळापर्यंत भोगावे लागतात. यामुळे जागरूक राहून स्वच्छतेची नवी संस्कृती निर्माण केली पाहिजे."

डॉ. प्रतिमा पवार, डॉ. विजय मारवडकर उपस्थित होते. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रल्हाद माने यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
महाराष्ट्र टाईम्स



अवधूत जाधव नामदेव हराळे प्रियांका पुरोहित राहुल आडनाईक

# 'आविष्कार'मध्ये विद्यापीठाचे यश

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ येथे झालेल्या अकराव्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या चार विद्यार्थ्यांनी यश मिळवले. स्पर्धेत कला, सामाजिक, शास्त्रे व ललितकला विभागात अवधूत जाधव, वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा विभागात प्रियांका पुरोहित, मुलभूत विज्ञान विभागात नामदेव हारळे व कृषी व पशुसंवर्धन गटात राहुल आडनाईक या स्पर्धाकांनी द्वितीय क्रमांक मिळवला.

यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांच्या हस्ते केला. यावेळी संघ व्यवस्थापक डॉ. ए. डी. जाधव, डॉ. जी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
तरुण भारत

# विद्यापीठाचे चार विद्यार्थी आविष्कार स्पर्धेत व्दितीय

**कोल्हापूर :** नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात पार पडलेल्या ११ व्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या ४ विद्यार्थांनी विविध स्पर्धेत यश मिळवले. महाराष्ट्रातून २० विद्यापीठातील ५३६ विद्यार्थ्यांनी तर शिवाजी विद्यापीठातील ४८ विद्यार्थ्यांनी अविष्कार स्पर्धेत सहभाग घेतला होता. अवधूत जाधव सामाजिक शास्त्रे व ललित कला विभाग पदव्युत्तर पदवी गटात व्दितीय. प्रियंका पुरोहित वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा विभाग पदवीगटात व्दितीय. नामदेव हारळे मूलभूत विज्ञान विंभाग शिक्षक गट व्दितीय. राहूल अडनाईक कृषी व पशुसंवर्धन शिक्षकगट व्दितीय.

या सर्व विद्यार्थ्यांचे प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. ए. डी. जाधव, डॉ. जी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, पीजीबीयुटीआर विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 FEB 2017
तरुण भारत

# तंत्रज्ञान अधिविभागात कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड कम्युनिकेशन तंत्रज्ञान विभागाने की साईटस टेक्नॉलॉजिस व सायरोनिक्स यांच्या संयुक्त विद्यमाने 'लेटेस्ट ट्रेन्डस ऑन टेस्ट अॅन्ड मेजरमेंट टेक्नॉलॉजी' या विषयावर कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत सायरोनिक्स बिझनेस प्रमुख शैलेश माने, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून मार्गदर्शन केले. यावेळी पी. व्ही. सावंत, प्रा. ए. ए. शिरोळकर, प्रा. ए. ए. डुम, नेहा शेख उपस्थित होते.